# दलित चळवळ : चिंता आणि चिंतन

शरणकुमार लिंबाळे

म. फुलेंची चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या घरोदारी आणली. दलितांची सामाजिक, शैक्षणिक चळवळ फुले, महर्षी शिंदे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, भाऊराव पाटील इ. प्रभृतींनी चालवली. या चळवळीची पाळेमुळे मजबूत करून दलितांची राजकीय चळवळ भारताच्या इतिहासात डॉ. आंबेडकरांनी खंबीरपणे नोंदवली. एकीकडे सामाजिक विषमतेविरुद्ध लढा पुकारून दलित समाज जागा करीत असताना, जागृत झालेल्या दलितांच्या संघशक्तीच्या जोरावर डॉ. आंबेडकरांनी दलितांचे राजकारण खेळवले. डॉ. आंबेडकरांसारखा विद्वान नेता दलितांना मिळाला, नाही तर दलितांचे राजकारण प्रेसच्या हातीच गेले असते.

डॉ. आंबेडकरांनी 'आपली जमात ही शासनकर्ती जमात बनली पाहिजे' म्हणून राजकीय जागराचे काम अहोरात्र केले. मरणाच्या शरपंजरावर हा भीम एकसंध रिपब्लिकन पक्षाचे स्वप्न पहात होता. ते स्वप्न किती साकार झाले, हे आज रिपब्लिकनवाल्यांनी स्वतःलाच विचारावे ! आज आंबेडकरी चळवळीचा राजकीय जीवनात पराभव होत आहे याची कारणपरंपरा तपासली पाहिजे.

बाबासाहेबांच्या मरणोत्तर काळात दलितांना विद्वान असा नेता लाभलाच नाही. बाबासाहेबांच्या पश्चात या चळवळीला उतार लागला. संघटनकौशल्य नसलेल्यांच्या हाती संघटनेची धुरा गेली. आंबेडकरांच्या अजोड व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या हयातीत त्यांचे नेतृत्व एकसंध राहिले, नाही म्हणायला जो विरोध झाला, तो आंबेडकरी नेतृत्वाला शह देऊ शकला नाही; पण नंतर मात्र, दलित समाजाचे नेतृत्व करण्याची हाव सर्वांनाच लागली. आणि म्हणूनच प्रति-बाबासाहेबांचे पेव फुटले !

संघटना एक तर बाबासाहेब अनेक झाले. विचार अनेक झाले. आचार अनेक झाले. एकाचे नेतृत्व दुसऱ्याला सलू लागले आणि नच या चळवळीचे पानिपत होण्यास सुरवात झाली. अध्यक्षपदासाठी, पक्षाची धुरा आपल्या हातात ठेवण्यासाठी रस्सीखेच सुरू झाली. लाथाळीला ऊत आला. या विस्कटू पाहणाऱ्या संघटनेला एकत्रित करून नेतृत्व करणारा संघटनकुशल नेता मिळू शकला नाही.

चळवळ संघटित करण्यापेक्षा चळवळीचे तुकडे पाडण्याचेच राजकारण खेळले गेले. एकसंध चळवळीत एकोप्याने काम करण्यापेक्षा गटागटाचे शिलेदार होणे पसंत केले आणि त्यामुळे अभेद्य संघटनाचे गटा-गटात रूपांतर जाले. वडिलांच्या मरणानंतर भावंडांनी जमीन-जुमला वाटून घ्यावा, अगदी तसे, या गटांनी दलित समाजला वाटून घेतले. दलित समाज 'इस्टेट' ठरला.

गटबाजीचे म्होरके अध्यक्ष झाले. आणि आपल्याभोवती त्यांनी आपली भुतावळ जमा केली. सोयिस्कररीत्या दलित समाजाची भलावण करून, आपले राजकारण पुढे दामटवले. कुणी आय काँग्रेसमध्ये, तर कोणी जनतेत, खुर्ची मिळेल तिथे आसरा शोधला. दलित समाज आपल्या पाठीशी आहे, आपण दलित समाजाचे (कर्तुमकर्तुम्) आहोत. आपला समाज आपण ज्या पक्षाशी समझौता करू त्यांनाच मते देईल अशी दलित नेत्यांची मनोभावना झाली. इतर राजकीय पक्षांनीही या दलित नेत्यांना आपल्या पक्षात ओढण्यासाठी सौदे सुरू केले. जागांची वाटणी, मंत्रिपदाचे आमिष अशामुळे दलित नेतृत्वाने इतरांची मांडलिकता स्वीकारली.

सत्ता आणि मत्ता यांत गर्क आलेला दलित राजकीय पक्ष हा समाजाचे प्रश्न सोडवण्यात असमर्थ ठरला. वरचेवर दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार यामुळे दलित समाजाची या नेतृत्वावरची श्रद्धा उडून गेली आणि दलित जनता या नेत्यांविषयी उदासीन झाली.

दलित राजकीय पक्षाकडे प्रभावी पक्षयंत्रणा नसल्याने दलित जनता इतर पक्षांच्या प्रचारसाधनामुळे त्या पक्षाकडे आपोआप वळली. या उदासीन हतबल अवस्थेत नव्या शिकून तयार झालेल्या तरुणांच्या पलटणी येऊ लागल्या. या गटबाजीच्या राजकारणावर संतप्त तरुण नाराज होते. त्यांनी स्वतःचा सवता सुभा मांडला. सुशिक्षित दलित तरुणात या राजकीय, सामाजिक व्यवस्थेविरुद्ध असंतोष धुमसत होता. या असंतोषाला न्याय्य व्यासपीठ मिळत नव्हते म्हणून दलित तरुणांनी एकत्र येऊन 'दलित पँथर' काढली. दलित पँथरच्या जहालपणामुळे अनेक विद्यार्थी तरुण या संघटनेकडे ओढले गेले. पण पुढे जाता आर. एस्. एस्. किंवा जमाते इस्लामसारखेच पँथरनेही जातिवादी स्वरूप धारण केले. आंदोलन, सभा, निषेध, घेराओ, उपोषण यामुळे पँथर ही सर्वांच्या डोळ्यात भरली. पँथरला प्रसिद्धी मिळाली. पण पँथरचे पुढे काय झाले ?

जे रिपब्लिकन पक्षाचे झाले; तेच पँथरच्या वाट्याला आले. पँथरच्या वाढत्या शक्तीचे नेतृत्व करण्यात स्पर्धा सुरू झाली आणि पँथरचे तुकडे उडाले. नामदेव ढसाळ पँथर, अरुण कांबळे पँथर अशी पँथरमध्ये गटबाजी निर्माण झाली राजा ढालेंनी पँथर बरखास्त करून, स्वतःच्या नेतृत्वासाठी मास मुव्हमेंटची स्थापना केली. ज्या तरुणांनी आशा निर्माण केली त्यांनी बे एके बे चा पाढा गिरवला. 'जाहीरनामा की नामा जाहीर' म्हणून राजा ढालेंनी ढसाळच्या विरोधात फळी उभी केली, तर ढसाळने 'ढालगज राजाभाऊचा रोगनामा' म्हणून स्वतंत्र चूल मांडली. या दोघांनाही बाजूला सारून अरुण कांबळेनी वेगळे पँथरचे काम सुरू केले.

जशी रिपब्लिकन पँथरमध्ये गटबाजी आहे, तशीच दलित साहित्यातही गटबाजी दिसून येईल. डॉ. गंगाधर पानतावणे, बाबूराव बागुल आणि भाऊसाहेब अडसूळ यांच्या निरनिराळ्या विचारसरणी. पानतावणे प्रतिवर्षी अस्मितादर्श लेखक वाचक मेळावा घेऊन आंबेडकरी साहित्याची चळवळ पुढे नेत आहेत, तर बाबूराव बागुल कम्युनिस्टांशी हातमिळवणी करून, सर्व पुरोगामी प्रवाहांशी बांधिलकी मानून दलित साहित्य संमेलन भरवीत आहेत. या दोन्ही साहित्य-

प्रवाहांशिवाय बौद्ध साहित्याचा तिसरा एक प्रवाह आहे जो अडसूळ चालवतात.

दलितांच्या सामाजिक, राजकीय, साहित्यिक जीवनात या गटबाजीने मूळ धरले आहे, तसेच सांस्कृतिक क्षेत्रात ही गटबाजी प्रकर्षाने दिसून येईल. १९५६ साली बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारला असला तरी अजून धर्मांतराचे लोण खेड्यापाड्यांतून पसरले नव्हते. राखीव सवलतीमुळे बहुसंख्याक सुशिक्षित समाज हा अजून हिंदूच आहे. शिवाय इस्लाम व ख्रिश्चनांना जसा परदेशातून पैसा मिळतो, तसे आर्थिक पाठबळ दलितांच्या धम्म चळवळीला नाही म्हणून ही चळवळ अजून म्हणावी तितकी मूळ धरलेली नाही.

भारतीय बौद्ध महासंघ—आर. डी. भंडारे, भारतीय बौद्ध संघ—पी. एन्. राजभोज, बुद्ध शासन सभा—बी. सी. कांबळे, बौद्ध जन पंचायत समिती—घनश्याम तळवटकर, बौद्ध महासभा—प्रकाश आंबेडकर अशा अनेक एकमेकांस विरोधी व विसंगत अशा धर्मीय चळवळी आहेत. प्रत्येकाने आपले नेतृत्वाचे पौरोहित्य टिकवण्यासाठी या संघटना काढल्या आहेत.

राजकीय संघटनेत बी. सी. खोब्रागडे, भंडारे, अशोक निळे, गवई, बाळकृष्णन्, भोळे इ. प्रभृतींनी गटबाजी जोपासून ठेवली आहे. जसे राजकीय गट एक होत नाहीत, तशीच सामाजिक, साहित्यिक वा धार्मिक गटबाजी संपुष्टात येत नाही, ही एक चिंतेची, चिंतनाची बाब आहे. राष्ट्र सेवा दल, युक्रांद, छात्र युवा संघर्ष वाहिनी, कम्युनिस्ट, पुरोगामी सत्यशोधक अशा अनेक संघटना या दलितांच्यासाठी अहोरात्र झटत आहेत. त्याही दलित चळवळीच आहेत. या पुरोगामी चळवळींनी दलितांमध्ये एक नवी जागृती, नवी पिढी निर्माण केली आहे, तरी पण दलित जनता आपल्या जातीय संघटनांकडेच जास्त ओढली जात आहे. एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, यदुनाथ थत्ते, बाबा आढाव, बाबा आमटे, गं. बा. सरदार, अनिल अवचट, जनार्दन वाघमारे, नरहर कुरुंदकर वगैरेसारख्यांची वैचारिक देणं कुण्या समाजाला नाकारता येणार आहे ?

दलित चळवळीचे मूल्यमापन करायचे म्हटले तर आंबेडकरी चळवळच मला अभिप्रेत आहे मातंग-ढोर-चांभार व इतर अस्पृश्य समाज आज सुप्त अवस्थेत आहेत. आदिवासी-भटक्यांच्या संघटना बांधल्या जात आहेत. मातंग समाजाचे मेळावे भरले जात आहेत. ही त्यांच्यातील जागृती दलित चळवळीला किंबहुना दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय साहित्यिक चळवळीला नवी दिशा दिल्याशिवाय राहणार नाही. महार, धर्मांतरित बौद्ध समाज व इतर अस्पृश्यांचे ऐक्य नाही. याला आंबेडकरवाद कारणीभूत नसून आंबेडकरी अनुयायांची मनोवस्था कारणीभूत आहे. तोंडात आंबेडकर आणि घरात मनू अशी विचारसरणी असल्यामुळे, आंबेडकरी चळवळ एकांगी ठरत आहे. महार समाजाने आंबेडकर पचवला असला तरी त्याच्या मनावरचे मनुस्मृतीचे जू अजून कायम आहे. अस्पृश्य तरुण वा समाज सवर्णांशी रोटी–बेटी करील, पण आपापसांत मात्र जातिव्यवस्था दृढपणे पाळील महार–मातंग–ढोर–चांभार वा भटके यांच्यातील जातीयता कोण नष्ट करणार ? हा एक मोठा प्रश्न आहे ! ◎ ◎


